REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 15 | ISSUE - 3 | DECEMBER - 2025

# वर्धा जिल्ह्यातील अस्थायी महिला गिरणी कामगारांचा समाजशास्त्रीय अभ्यास

**श्री. प्रमोद चंद्रभान वानखेडे**
सहाय्यक प्राध्यापक, समाजशास्त्र विभाग
रा. सु. बिडकर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, हिंगणघाट, जि. वर्धा.

**प्रा. डॉ. राजेंद्र जर्नाधन कांबळे**
समाजशास्त्र विभाग प्रमुख
इंदिरा गांधी कला व वाणिज्य महाविद्यालय, कळमेश्वर, जि. नागपूर.

**गोषवारा (Abstract):**



वर्धा जिल्हा हा विदर्भातील एक महत्त्वाचा औद्योगिक आणि कृषी जिल्हा असून येथे अस्थायी महिला गिरणी कामगारांचे प्रमाण व्यापक आहे. ग्रामीण भागातून दररोज मोठ्या प्रमाणावर महिला गिरण्यांमध्ये येऊन श्रम करतात. आर्थिक गरज, पतीचा अस्थिर उत्पन्न, कुटुंबातील जबाबदारी, मुलांच्या शिक्षणाची आवश्यकता, सामाजिक दबाव या कारणांमुळे त्या अशा अस्थिर रोजगारात कार्यरत राहतात. आजचा आधुनिक समाज विज्ञान, तंत्रज्ञान, औद्योगिकीकरण व जागतिकीकरणाच्या प्रभावाने वेगाने बदलत आहे. औद्योगिक विकासामुळे रोजगाराच्या विविध संधी उपलब्ध झाल्या असल्या, तरी त्या संधींचा समान लाभ समाजातील सर्व घटकांना मिळत नाही. विशेषतः अनौपचारिक क्षेत्रात काम करणाऱ्या महिला कामगारांचे जीवन अत्यंत कठीण व असुरक्षित आहे. भारतात महिला कामगारांचा मोठा वर्ग गिरणी, बांधकाम, शेती प्रक्रिया उद्योग, कापड उद्योग, धान्य प्रक्रिया, तेल गिरण्या, साखर कारखाने, विटभट्टी, वखारे व छोट्या उत्पादन व्यवसायांमध्ये कार्यरत आहे. या क्षेत्रांमध्ये काम करणाऱ्या महिलांपैकी मोठे प्रमाण हे अस्थायी, कंत्राटी आणि असंघटित कामगारांचे आहे. त्यांना नोकरीची हमी, निश्चित वेतन, आरोग्य सुरक्षा, कायदेशीर संरक्षण, सामाजिक सुरक्षा योजनांचा लाभ, मातृत्व सुविधा किंवा

निवृत्ती लाभ उपलब्ध नसतात. यामुळे त्यांचे जीवन सतत अस्थिरता, आर्थिक ताण, सामाजिक असमानता व शोषण यामध्येच व्यतीत होते. प्रस्तुत संशोधन पेपेरमध्ये वर्धा जिल्ह्यातील अस्थायी महिला गिरणी कामगारांचा समाजशास्त्रीय अभ्यास करण्यात आला आहे.

**शब्दसंकेत (Keywords) :** अस्थायी महिला कामगार, गिरणी उद्योग, मजुरी व रोजगार अस्थिरता, कामगार अधिकार, लिंग असमानता.

## प्रस्तावना

18 व्या शतकात इंग्लंडमध्ये औद्योगिक क्रांतीला सुरुवात झाली. लवकरच युरोपच्या इतर देशामध्येही या क्रांतीचा प्रसार झाला. औद्योगिक क्रांतीने आर्थिक क्षेत्रात मोठे बदल झाले. या बदलामुळे जुनी समाजव्यवस्था व अर्थव्यवस्था ढासळून गेली. त्यातुन समाजात अनेक नव्या समस्या निर्माण झाल्या. या समस्यापैकी कामगार वर्गाची समस्या ही अत्यंत महत्त्वाची समस्या होती. उत्पादनाच्या क्षेत्रातील औद्योगिक क्रांतीचा एक महत्त्वाचा परिणाम म्हणजे कारखाना उत्पादन पद्धतीला सुरुवात होय. या नव्या उत्पादन पद्धतीमुळे मालक आणि कामगार यांच्यातील संबंधातही बदल झाला. जुन्या गृहउद्योग उत्पादन पद्धतीमध्ये मालक व कामगार यांच्यात प्रत्यक्ष स्वरुपाचे संबंध होते. त्यामुळे त्यांच्यात संघर्ष निर्माण झाले तरी ते परस्पर विचाराने सोडविले जात असत पण नव्या उत्पादन पद्धत्तीमुळे मालक व कामगार यांच्या अप्रत्यक्ष स्वरुपाचे संबंध प्रस्थापित झाले. त्याचबरोबर या पद्धतीमुळे मालक वर्गाला लाभ उठविता आला. मोठ्या प्रमाणावर उत्पादन होऊ लागल्यामुळे मालक वर्गाचे नफ्याचे प्रमाणही वाढले. याउलट कामगार वर्गाला मात्र दयनीय अवस्था प्राप्त झाली. त्यांना अत्यंत प्रतिकूल परिस्थितीमध्ये काम करावे लागले. मालक वर्गाकडून त्यांची मोठ्या प्रमाणात पिळवणूक होऊ लागली. त्यामुळे मालक व कामगार यांचे हितसंबंध परस्पर विरोधी बनले. सुरुवातीच्या काळात मालक वर्गाने कामगारांच्या या अवस्थेची मुळीच दखल घेतली नाही. तेव्हा ही परिस्थिती बदलण्यासाठी कामगार वर्गाला स्वतःच काही हालचाल करणे भाग पडले. त्यांनी आपल्या हक्काचे रक्षण करण्यासाठी आपल्या संघटना स्थापन करण्यास सुरुवात केली.

कामगार संघटना ही आजच्या औद्योगिक समाजातील एक महत्त्वाची संस्था आहे. समाजामध्ये कामगार संघटनांचे अस्तित्व अपरिहार्य आहे. कारण कामगारांना आपल्या न्याय मागण्या प्राप्त करुन घेणे कामगार संघटनांमार्फत शक्य होते. औद्योगिकदृष्या पुढारलेल्या सर्व देशामध्ये कामगार संघटना अत्यंत महत्त्वाची शक्ती बनली आहे. विकसनशील देशामध्येही जसजसे औद्योगिकरण होत जाईल तसतशी कामगार संघटनाची वाढ होणे स्वाभाविक आहे. एकेकाळी भांडवलदार वर्गाचा आणि सरकारचा कामगार संघटनांकडे पाहण्याचा दृष्टिकोन फारसा निकोप नव्हता. पण आज मात्र कामगार संघटनांचे अस्तित्व आणि महत्त्व सर्वांनाच मान्य झाले आहे. कामगार संघटना आपल्या सभासदांना केवळ आर्थिक मागण्यासाठी लढावयालाच शिकवत नाहीत तर देशाच्या औद्योगिक प्रगतीलाही त्या हातभार लावतात.

आरंभीच्या काळात कामगार संघटीत होण्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे आपण एकटे मालक वर्गाशी सामना करु शकत नाही. हे कामगारांच्या लक्षात आले. मालक आणि कामगार यांच्या संघर्षात कामगार नेहमीच दुबळा ठरतो. कारण हे

दोन्हीही वर्ग परस्परावलंबी असले तरी कामगारांचे श्रम ही नाशवंत गोष्ट असल्याने तिचा संचय करता येत नाही. त्यामुळे कामगार कामाशिवाय थांबू शकत नाही. कामगारांची ही दुर्बलता मालक वर्ग ओळखत असल्याने तो कामगारांच्या श्रमाचा योग्य मोबदला देत नसत. याचा विरोध करणे एकट्या कामगाराला शक्य नव्हते. या परिस्थितीवर मात करण्यासाठी कामगारांनी संघटित होण्याचा मार्ग स्विकारला. आपल्या संघटनेमार्फत मालक वर्गाची कोंडी करुन त्यांच्याशी बरोबरीच्या नात्याने वागू शकतो हे कामगार वर्गाला कळून आले.

प्राचीन काळी कामगार संघटना स्थापन करणे ही सोपी गोष्ट नव्हती. या काळात कामगार संघटनांच्या नेत्यांना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागले. कारण अशा संघटनांना मालकांचा आणि सरकारचाही विरोध होता. इंग्लंड, अमेरिकेमध्ये तर कामगार संघटना स्थापन्यावर बंदी घालण्यात आली आणि संघटना स्थापन करणे हा गुन्हा समजण्यात आला. अशा प्रतिकुल परिस्थितीत सुरुवातीच्या काळात कामगार संघटनांना काम करावे लागले.

सुशिक्षीतपणा व सुबत्ता लाभलेल्या अनेक व्यक्तींनी मानवतावादी, उदारमतवादी अशा दृष्टीकोनातून कामगार, श्रमिक व दारिद्रय पिडीत जनतेच्या भल्यासाठी उत्साहाने भाग घेतला. गरीब व कष्टकरी यांच्या हालअपेष्टा कमी करुन त्यांचे अस्तित्व सुसह्य करण्याचा प्रयत्न केला. मुख्यतः मुंबईमधील श्री. नारायण मेघाजी लोखंडे व कलकत्ता येथील ब्राम्हो समाजाचे कार्यकर्त या लोकांनी ओद्योगिक कामगारांच्या हितासाठी प्रयत्न केले. त्याचबरोबर कामगार हितासाठी स्थानिक भाषेत पत्रिका प्रसिध्द करणारे श्री. शशिपाद बॅनर्जी त्यांनी 1871 ला विलायतेला जाऊन तिथेही भारतातील औद्योगिक कामगारांच्या दुर्दशेची ओळख आपल्या भाषणातून करुन दिली. श्री. सोराबजी शापूरजी बंगाली यांनी गिरणी कामगारांच्या परिस्थितीत सुधारणा घडवून आणण्यासाठी इ.स. 1878 मध्ये प्रयत्न केले. याच काळात साम्यवादी सिध्दांतात बसेल अशी कुठलीच कामगार संघटना किंवा सार्वत्रिक एकत्र असा कामगारांनी दिलेला लढा या काळात उद्भवलेला आढळत नाही. तरी सुध्दा कामगारांची वाढती संख्या व त्यांचे वाढते प्रश्न यामुळे कामगारांकडून विरोध प्रदर्शन, प्रतिकार होत राहिला. संघटित असा लढा कुठे झाला नसला तरी विस्तृत प्रमाणात व बरेचसे विखुरलेले तंटे होत राहिले.

जे तंटे अथवा संप झाले त्याची कारणे मजुरीच्या दरात अचानक कपात करणे, खाडे कापणे, खाडा कापून मजुरी हातावर ठेवणे. 5 ते 10 मिनीटांच्या उशिरासाठी अध्र्या दिवसाची मजुरी कापणे, सणावारासाठी रजा नाकारणे, कामाचे अनियमित भरमसाठ तास ठेवणे ही असत. कामगारांच्या समस्या, तक्रारींचे क्वचित प्रसंगी निवारणही केले जात असे. 11 तासांचा दिवस, अर्धा तास जेवणाची सुट्टी, साप्ताहिक सुट्टी (कधी पगारी किंवा बिनपगारी) इत्यादी मागण्या काही उदार मालकांनी मान्य केल्या होत्या. परंतु या मान्य झालेल्या मागण्या करार म्हणून कागदोपत्री नोंदल्या गेल्या नाहीत किंवा त्याला कायदेशीर असे कुठले स्वरुपही लाभले नाही. या सवलती देणे न देणे संपूर्णतः कारखान्याच्या मालकाच्या मनावर अवलंबून असे.

भारत हा कृषिप्रधान आणि श्रमिकप्रधान देश असून देशाच्या आर्थिक, सामाजिक व औद्योगिक विकासात महिला कामगारांचे योगदान अतुलनीय आहे. अनौपचारिक क्षेत्रातील कामगारांमध्ये महिलांचे प्रमाण लक्षणीय असून त्यांपैकी मोठा भाग हा विविध प्रकारच्या गिरण्या, उद्योग-कारखाने, प्रक्रिया उद्योग, बांधकाम क्षेत्र, रस्ते कामे, विटभट्टी तसेच शेतीसह संलग्न उद्योगांमध्ये कार्यरत आहे. वर्धा जिल्हा हा कपड्यांच्या गिरण्या, तांदुळ गिरण्या, पीठ गिरण्या, तूर डाळ गिरण्या, तेल गिरण्या

इत्यादी प्रक्रिया उद्योगांसाठी प्रसिद्ध आहे. या गिरण्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर अस्थायी महिला कामगार कार्यरत असून कुटुंबाच्या आर्थिक गरजा भागविण्यासाठी त्या अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतही श्रम करतात. अस्थायी महिला गिरणी कामगारांचे कार्य हे निश्चित वेळ, निश्चित वेतन, हक्क व सुरक्षा यापासून वंचित असते. त्यांना आरोग्यसुरक्षा, मातृत्व लाभ, विमा, भविष्य निर्वाह निधी, सामाजिक सुरक्षा व स्थिर रोजगाराचा कोणताही आधार उपलब्ध नसतो. या कामगारांना दिवसागणिक काम मिळेल याची खात्री नसते, परिणामी त्यांच्या जीवनमानावर, सामाजिक स्थानावर, आरोग्यावर, आर्थिक स्थितीवर तसेच कुटुंबातील जबाबदाऱ्यांवर विपरित परिणाम होतो. आजच्या औद्योगिक युगात महिला सबलीकरण, स्त्री-पुरुष समता, कामगार हक्क, सामाजिक न्याय या संकल्पना जोरात मांडल्या जात असल्या तरी वास्तव जीवनात अस्थायी महिला गिरणी कामगार अजूनही बहुआयामी समस्यांना सामोरे जात आहेत.

## संशोधनाची उद्दिष्टे

1. वर्धा जिल्ह्यातील अस्थायी महिला गिरणी कामगारांची सामाजिक व आर्थिक स्थितीचा अभ्यास करणे.
2. अस्थायी महिला गिरणी कामगारांच्या उन्नतीसाठी आवश्यक असलेल्या उपाययोजना सुचवणे.

## महिला कामगार

भारतीय महिला कार्यशक्तीचा एक अविभाज्य भाग आहे. रजिस्टर जनरल आणि जनगनना आयुक्त कार्यालयाचे दिलेल्या माहितीनुसार 2011 च्या जनगननेनुसार भारतातील एकुण महिला कामगारांची संख्या 149.8 दशलक्ष आहे. आणि ग्रामीण व शहरी भागात महिला कामगारांची संख्या अनुक्रमे 121.8 आणि 28.0 दशलक्ष आहे. एकूण 149.8 दशलक्ष महिला कामगारांपैकी 35.9 दशलक्ष महिला शेतकरी म्हणून काम करीत आहेत. आणि 71.5 दशलक्ष शेतमजूर आहेत. 8.5 दशलक्ष महिला कामगार घरगूती उद्योगात आहेत आणि 43.7 दशलक्ष महिला कामगार इतर क्षेत्रात वर्गीकृत आहेत.

2011 च्या जनगननेनुसार 2001 च्या 25.63 टक्यांच्या तुलनेत महिलांच्या कामातील सहभागाचा दर 25.27 टक्के आहे. 2011 मध्ये महिलांच्या कामातील सहभाग दर किरकोळ कमी झाला आहे. परंतु 1991 मध्ये 22.27 टक्के आणि 1967 मध्ये सुधारणा झाली आहे. 1981 मध्ये शहरी भागातील 15.44 टक्यांच्या तुलनेत ग्रामीण भागातील महिलांचा सहभाग 30.02 टक्के आहे.

संघटीत क्षेत्राचा विचार करता मार्च 2011 मध्ये देशातील संघटीत क्षेत्रातील एकूण रोजगारांच्या 20.5 टक्के महिला कामगार होत्या. जे मागील वर्षाच्या तुलनेत 0.1 टक्यांनी जास्त आहे. 31 मार्च 2011 रोजी रोजगार आणि प्रशिक्षण महासंचालयाने केलेल्या शेवटच्या रोजगार पुनरावलोकनानूसार संघटीत क्षेत्रात (सार्वजनिक व खाजगी क्षेत्र) सुमारे 55.54 लाख महिला कामगार कार्यरत होत्या. यापैकी 32.14 लाख महिला सामुदायिक, सामाजिक आणि वैयक्तिक क्षेत्रात काम करीत होत्या.

## महिला कर्मचाऱ्यांसाठी संरक्षणात्मक तरतूदीः-

### फॅक्टीज ऍक्ट

1948 च्या कलम 22 (2) मध्ये अशी तरतूद आहे की, प्राईम मूव्हर किंवा ट्रान्समिशन मशीनरी चालू असतांना कोणत्याही महिलेला प्राईम मूव्हर किंवा ट्रान्समिशन मशीनचा कोणताही भाग साफ, वंगण किंवा समायोजित करण्याची परवानगी दिली जाणार नाही. कोणत्याही मशीनचा कोणताही भाग वंगण घालने किंवा समायोजित करणे, जर त्याची साफसफाई, वंगन किंवा समायोजन त्या महिलेला त्या मशीनच्या किंवा कोणत्याही लगतच्या यंत्राचा कोणत्याही हलत्या भागातून दुखापतहोण्याचा धोका असेल.

### रात्रीच्या कामावर बंदी:-

1. कारखाना अधिनियम 1948 च्या कलम 22 (2) मध्ये असे नमूद केले आहे की, सकाळी 6 ते संध्याकाळी 7 या वेळेशिवाय कोणत्याही महिलेला कोणत्याही कारखान्यात श्रम करण्याची आवश्यकता नाही किंवा परवानगी दिली जाणार नाही.
2. बिडी व शिगार कामगार अधिनियम 1966 च्या कलम 25 मध्ये असे नमूद केले आहे की, कोणत्याही महिलेला औद्योगिक परिसरात काम करण्याची आवश्यकता नाही. किंवा परवानगी दिली जाणार नाही.
3. खान कायदा 1952 चे कलम 46 (1) (7) सकाळी 6 ते संध्याकाळी 7 या वेळेशिवाय जमिनीवरील कोणत्याही खाणीत महिलांना कामावर ठेवण्यास मनाई करते.

### औद्योगिक कामगार

भारतात फॅक्टरी ऍक्ट लागू असलेल्या औद्योगिक आस्थापणामध्ये (संघटीत उद्योग) कार्यरत असलेले कामगार म्हणजे औद्योगिक कामगार होय. 19 व्या शतकाच्या मध्यापासून भारतीय कारखानदारी उद्योग अत्यंत मंदगतीने वाढत असल्यामुळे औद्योगिक कामगारांची संख्यादेखिल अत्यंत मंद गतिने वाढत आहे. 1950 ते 1993 या काळात सुरु असलेल्या कारखान्यामधील कामगारांची रोजची सरासरी संख्या 30 लाखावरुन 51 लाखापर्यंत वाढली भारतातील रोजगार श्रम लोकसंख्येत औद्योगिक कामगारांचे प्रमाण केवळ 2.4 टक्के ऐवढे आहे सन 1998 मध्ये संघटीत क्षेत्रात असलेले औद्योगिक कामगारांचे प्रमाण कमी असले तरी देशाच्या अर्थव्यवस्थेत महत्वपुर्ण आहे.

भारतात जास्तीत जास्त लोकसंख्या शेती क्षेत्रात गुंतलेली आहे. त्यामुळे औद्योगिक क्षेत्रातील बहुतेक कामगारांची पाळेमुळे ग्रामीण भागाशी जुळलेली आहेत. औद्योगिक कामगारांपैकी फार मोठ्या संख्येने कामगार खेडयातील आपले परंपरागत व्यवसाय सोडून शहरात रोजगारासाठी आलेले असतात. औद्योगिक कामगार हे अशिक्षित किंवा अल्पशिक्षित असल्यामुळे उद्योगासमोरील समस्या किंवा त्यांच्या स्वतःच्याही समस्या त्यांना लवकर समजत नाही. भारतात असंख्य जाती, धर्म, भाषा, प्रदेष आहेत. त्यामुळे या विविध प्रकारांमुळे भारतीय कामगार त्या त्या जाती, धर्म भाषा यात विभागला गेला आहे.

### महिला कामगारासंदर्भात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्यः

भारतीय कामगारांच्या समस्याबाबत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी डोळसपणे विचार केलेला दिसतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे कामगारांकडे केवळ कामगार म्हणून न पाहता तो प्रथम एक व्यक्ती आहे या दृष्टीने पाहतात. एक व्यक्ती एक मुल्य, व्यक्ति स्वातंत्र्य, संधीची समानता आणि सत्तेतील सहभाग हे आपले जीवनमुल्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर कामगार वर्गालाही लागू करतात. आंबेडकर पूर्वकाळात स्त्रियांची स्थिती अत्यंत हालाखीची व दयनीय होती. भारतीय स्त्रियात साक्षरतेचा अभाव, सतीप्रथा, बहुपत्नीत्वाची प्रथा, बालविवाहाची प्रथा, सक्तीचे वैधव्य इत्यादी प्रथा होत्या. म्हणून ज्योतीरावांनी पहिला महत्त्वाचा कार्यक्रम ठरविला. तो म्हणजे शिक्षणाचा समाजातील महिलांना आधुनिक ज्ञान प्राप्त व्हावयास पाहिजे याची त्यांना जाणीव झाली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी तेच काम पुढे नेले आणि महिलांचे जीवनमान उंचवण्यासाठी प्रयत्न केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक कार्याच्या सुरुवातीपासूनच कामगार चळवळीशी निगडीत होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना पुरुष कामगाराच्या समस्येप्रमाणे महिला कामगारांच्या समस्येचे, त्यांच्या व्यथाची पूर्णपणे जाणीव होती. त्याचप्रमाणे महिला कामगारांच्या समस्या, त्यांच्या पुढील अडचणी, त्यांनी बिकट परिस्थिती याचा देखील अभ्यास होता. त्यांनी महिला कामगारांच्या अडचणी, समस्या त्यांचे वेगवेगळे प्रश्न सोडविण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी महिला कामगारांचे अनेक प्रश्न सोडविले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर विधीमंडळात काम करीत असताना त्यांनी गरीब वर्गाची प्रगती साधण्याचा प्रयत्न केला. त्यांनी महिला कामगारांच्या हिताचा विचार करुन विधीमंडळात जेव्हा महिला कामगारांना प्रसूतिकाळात सवलती देण्यासंबंधी विधेयक 28 जुलै 1928 ला मांडण्यात आले तेव्हा त्यांनी या विधेयकाला पाठींबा दिला. विधेयकावर चर्चा होताना असा प्रश्न काही सदस्यांनी उपस्थित केला की, कामगारांनी काम करीत असताना अपघात झाल्यास त्यांना काही दिवस कामातून सुट कामगार क्षतिपूर्ति नियमानुसार मिळते. परंतु महिलांना प्रसूती पूर्व काळात व प्रसुतीनंतरच्या काळात विश्रांती देण्यास हा काही अपघात नव्हे. या प्रश्नावर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी महिला कामगारांची बाजू उचलून धरुन ते म्हणाले, ”प्रत्येक मातेला प्रसूती पूर्वकाळात आणि प्रसूतीनंतरच्या काळात ठराविक दिवस विश्रांती मिळणे हे राष्ट्राच्या दृष्टीने हिताचे आहे.“ पुढे डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले, ”मी हे मान्य करतो की, यांची बहुतांशी जबाबदारी सरकारला उचलावी लागेल. त्याचबरोबर त्यासाठी होणारा व्यय सरकारने सोसावा. तथापी तत्कालीन परिस्थितीत तो भार मालक वर्गाने सोसावा, असे जे विधेयकाचे उद्दिष्ट आहे ते चूक आहे असे म्हणता येणार नाही. महिला कामगार नोकरीस ठेवणे मालक वर्गास फायदेशीर असते कारण पुरुष कामगार कामावर ठेवण्यापेक्षा महिला कामगार कामावर ठेवल्यास मालकाला अधिक नफा होतो.“

डॉ. बाबासाहेव आंबेडकरांना 1942 मध्ये भारत सरकारने मजूर मंत्री म्हणून नियुक्त केले. मजूर मंत्री म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी महिला कामगारासाठी भरगोस असे काम केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 29 जुलै 1943 रोजी सभागृहात 1941 मध्ये खाणीतील महिला कामगारांना प्रसूती भत्ता या अधिनियममध्ये सुधारणा करणारे विधेयक मांडले. हे बिल आणण्याचे महत्त्वाचे कारण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितले ते म्हणाले, ”खाणीमध्ये काम करणाऱ्या कामगार महिलास दर दिवशी 8 आणे दराने आठ आठवडे प्रसूती भत्ता मिळतो. या आठ आठवड्याच्या काळाचे दोन भाग करण्यात आले आहे. चार आठवडे. प्रसूती पूर्वीचा काळ व चार आठवडे प्रसूती नंतरचा काळ, प्रसूतीपूर्वीच्या चार आठवड्यात खाणीतील कामगार महिलाने खाणीत काम करावे व पूर्ण मंजुरी घ्यावी किंवा या काळात कामावरुन गैरहजर रहाचे व प्रसूती भत्ता घ्यावा.

प्रसुतीनंतरच्या चार आठवड्यांच्या काळात खाणीतील कामगार महिलाने कामावर येऊ नये. त्या महिला कामगाराने सक्तीची विश्रांती घ्यावी. तिने या काळात कामावर न येणे व फक्त प्रसूती भत्यावर संतुष्ट राहणे बेकायदेशीर आहे. कलम नं. 5 मध्ये याबाबतची जी तरतूद आहे. त्यामध्ये 'कामावरुन गैरहजर' असे वापरलेले शब्द मोघम स्वरुपाचे होते त्याबाबत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सभागृहाला स्पष्टीकरण दिले एखाद्या दिवशी खाण बंद असेल तर त्या दिवशी अशा कामगार महिलास प्रसूती भता मिळू शकेल काय? त्याचे उत्तर असे की, त्या कामगार महिलास अशा दिवशी प्रसूती भत्ता मागण्याचा अधिकार नाही. कारण ज्या दिवशी खाण बंद असते. त्या दिवशी काम नसते आणि त्यामुळे कामावरुन गैरहजर राहण्याचा प्रश्न निर्माण होत नव्हता. 'कामावरुन गैरहजर या शब्दामध्ये अशा प्रकारचा मोघमपणा होता. प्रसूती भत्याबाबत जे निरनिराळे कायदे करण्यात आले होते. त्यामधील पाच कायद्यातील तरतुदीची तुलना चालू कलम नंबर 5 मधील तरतुदीशी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केली. त्या इतर पाच कायद्यात कामावरुन गैरहजर हा शब्द वगळून सदर संदिग्धपणा दूर करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर सदर विधेयक सभागृहात मांडले. या सुधारित विधेयकात बाळंतपणापूर्वीच्या चार आठवड्याच्या काळातील प्रसूती भत्ता मिळण्याचा हक्क महिला कामगारांस राहणार होता.

## वर्धा जिल्ह्याची ऐतिहासिक पार्श्वभूमी

महाराष्ट्राचा  एक अविभाज्य घटक म्हणून विदर्भ मान्यता पावलेला आहे. प्राचीन काळापासुन तर आधुनिक काळापर्यंत ऐतिहासिक परंपरा लाभलेला वर्धा जिल्हा महाराष्ट्रातील इतर जिल्ह्याच्या मानाने खूप लहान आहे. वर्धा जिल्हा आकाराने लहान असला तरी आधुनिक इतिहासाच्या दृश्टीने संपूर्ण जगाशी परिचित आहे. ईशान्य महाराष्ट्रातील वर्धा-वैनगंगा खोऱ्याच्या पश्चिम भागात वर्धा जिल्हा आहे. पवनार उत्खननातील प्राप्त माहितीनुसार या परिसरात इ.स.पूर्व 1000 ते 800 च्या दरम्यान या ठिकाणी मानवाचे वास्तव्य असावे. या जिल्हाच्या उत्तरेला सातपुडा पर्वत रांगा असून पश्चिमेला पूर्णा नदीचे खोरे, पूर्वेस नागपूर जिल्ह्याच्या मैदानी प्रदेश असून पश्चिम, उत्तर, दक्षिण सिमेवरुन वर्धा नदी प्रवाहित होते. पूर्वेकडे वणा आणि तिच्या उपनदया प्रवाहित होतात. वणा नदी व वर्धा नदीचा संगम आहे.

वर्धा नदी ही जिल्ह्याच्या पश्चिम, उत्तर, दक्षिण सिमा निश्चित करीत असल्यामुळे या नदीच्या नावावरुन जिल्ह्याला वर्धा जिल्हा म्हणून इंग्रजांनी संबोधले असावे. परंतू वर्धा या नावाविशयी स्थानिक लोकांच्या समजूती नुंसार वर्धा नदी वराहाच्या मुखातून उगम पावते. त्यामुळे या नदीचे मुळ नाव वराह असून त्यानंतर मात्र वर्धा हे नाव पडले असावे. वर्धा नदीच्या खोऱ्यात पूर्वी वडाची झाडे मोठया प्रमाणात होती. त्यामुळे जनरल कॅनिंगहॅमने वर्धा हे नाव वडाच्या झाडावरुन पडले असावे असे देखील सांगितले आहे. साधारणता वर्धा जिल्हा इ.स. 1862 पर्यंत नागपूर जिल्ह्यामध्येच समावेश होता. परंतू त्यावेळच्या नागपूर जिल्हाचे क्षेत्रफळ फार मोठे होते. एवढया मोठया जिल्ह्याचे प्रशासन चालविणे अशक्य होते. म्हणून नागपूर जिल्ह्याचे दोन भाग करण्यात आले. त्यामुळे 1862 मध्ये नागपूरमधून सध्याचा वर्धा जिल्हा वेगळा करण्यात आला. त्यावेळी जिल्ह्याचे मुख्यालय पुलगाव जवळील 'कवठा' या गावी ठेवण्यात आले. कालांतराने इंग्रजांना हे गाव जिल्ह्याचे मुख्यालय म्हणून सोयीचे वाटत नसल्यामुळे इ.स. 1866 ला 'कवठा' या ठिकाणावरुन जिल्ह्याचे मुख्यालय पालकवाडी या गावाला नेण्यात आले आणि त्याच ठिकाणी वर्धा शहर स्थायिक झाले.

वर्धा जिल्ह्यातील तालुक्यांच्या सिमांमध्ये 1911 ते 1980 या कालावधीत कोणतेही परिवर्तन करण्यात आले नव्हते. इ.स.1956 मध्ये राज्य पुर्नरचनेच्या वेळी हा जिल्हा मध्यप्रदेश मधुन मुंबई राज्यात समाविष्ट करण्यात आला आणि 1 मे 1960 पासून महाराष्ट्र राज्याचा एक भाग झाला आहे. शासनाने दिनांक 1 में 1980 पासून जिल्ह्यातील विकास गटांना स्वतंत्र तालुक्याचा दर्जा दिल्यामुळे वर्धा जिल्ह्यातील तालुक्याची संख्या सात झाली तसेच 15 ऑगस्ट 1984 पासून कारंजा तालुका निर्माण करण्यात आला. अशा पद्धतीने वर्धा जिल्हा तीन उपविभाग आणि आठ तालुक्यात विस्तारलेला आहे.

वर्धा जिल्ह्यातील भौगोलिक वातावरणाचा अभ्यास केल्यास जिल्ह्याच्या पूर्वेस चंद्रपूर, पश्चिमेला अमरावती, उत्तरेला नागपूर तर दक्षिणेला यवतमाळ जिल्हा आहे. वर्धा जिल्हा $20^{0}$-$28^{0}$ आणि $21^{0}$-21 उत्तर अक्षवृत्त आणि $78^{0}$-$4^{0}$ आणि $79^{0}$-$15^{0}$ पूर्व रेखाकृतीमध्ये पसरला आहे. वर्धा जिल्हा आणि वैनगंगा या नदयांच्या खोऱ्यात वसला आहे. वर्धा नदी आणि तिची वणा ही उपनदी आहे. या प्रदेशातून जलनिःसारण करतात. वर्धा जिल्ह्यातील सर्व नदया विविध डोंगर माथ्यावर व उत्तरेकडील सातपूडा पर्वताच्या रावणदेव, गरमसुर टेकडया, माळेगाव टेकळया, नांदगाव टेकळया, ब्राम्हणवाडा टेकडयांवर उगम पावतात. वर्धा आणि वणा नदीचा काही भाग वगळल्यावर पोथरा, बोर, धाम, पंचधारा, यशोदा, वाकळी आणि कार इत्यादी सर्व नदया हंगामी स्वरुपाच्या आहेत. पावसाळयात येणाऱ्या पुरांमुळे जवळपासच्या शेतीचे अतिशय मोठया प्रमाणात नुकसान होते. या सर्व नदयांना उन्हाळयात फार कमी पाणी असते. वर्धा जिल्ह्यात धरण प्रकल्पातंर्गत एकूण आठ धरणे बांधली आहे. आर्वी, कारंजा, आष्टी, सेलू आणि समुद्रपूर तालुक्यात उल्लेखनिय वनक्षेत्रे आहे. जिल्ह्यातील जंगलाचे एकूण क्षेत्रफळ 858.087 चै.कि.मी. आहेत्र त्यापैकी राखीव जंगल 527.882 चै.कि.मी.संरक्षित जंगले आहेत. जिल्ह्यातील जंगले एकूण भौगोलिक क्षेत्रफळाच्या 14 टक्के ऐवढे आहे.

## संदर्भग्रंथ सूची


1. कदम मनोहर, भारतीय कामगार चळवळीचे जनक नारायण मेघाजी लोखंडे मनोहर, महात्मा फुले समता प्रतिष्ठाण मुंबुई, 1996,
2. सरवदे भिमराव, आंबेडकरी कामगार चळवळ, सारीपुत्र, प्रकाशन, औरंगाबाद, 2001, पृ. क्र. 32.
3. कऱ्हाडे बी. एम., 'भारतीय समाज प्रश्न आणि समस्या,' प्रकाशक, पिंपळापूरे अन्ड कं. पब्लिशर्स, महाल नागपूर, 2010, पृ. क्र. 57.
4. जंगले मंगला 'औद्योगिक अर्थशास्त्र, प्रकाशन, श्री. रंगराव पाटील, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव 2011, पृ. क्र. 217.
5. बोधनकर सुधिर व अलोणी विवके (2003): "सामाजिक संशोधन पद्धती", श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर.
6. आगलावे प्रदीप (2008): "सामाजिक संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे", श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर.
7. बॉम्बे लेजिस्लेटिव काऊंसिल डिबेटस्, खंड 23, 28 जुलै 1928, पृ. क्र. 381.
8. बॉम्बे लेजिस्लेटिव काऊंसिल डिबेटस्, खंड 23, 28 जुलै 1928, पृ. क्र. 382.
9. विधान सभा वाद विवाद (केंद्रीय) खंड 3, 29 जुलै 1943, पृ. क्र. 39, 40.